सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रो. (डॉ.) सदानंद भोसले
एम्.ए., पीएच्.डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

संदर्भ : रासेयो/२०२४–२५/५४३ दि. २१/०२/२०२५

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्हा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय : अवयवदान प्रबोधनाने दरवर्षी ४ लाख व्यक्तींना जीवनदान देण्याचे व १ लाख अंधांना दृष्टी देण्याचे मोफत ऑनलाईन प्रशिक्षण राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांना देण्याबाबत..

संदर्भ : क्रमांक:रासेयो–२०२५/प्र.क्र.०८/ई–९३२२६४/रासेयो कक्ष, दि. १८फेब्रुवारी,२०२५ चे पत्र

महोदय,

मा. राज्य संपर्क अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, महाराष्ट्र शासन यांच्या पत्रानुसार केंद्र शासनाच्या 'राज्य अवयव प्रत्यारोपण समितीच्या' तज्ञांचे मार्गदर्शन घेऊन V4 ऑर्गन फाऊंडेशन, मुंबई यांनी अवयवदान प्रबोधन प्रशिक्षणाचे परिपूर्ण साहित्य तयार केले आहे.

त्यानुसार टेलिग्रामद्वारे ऑनलाईन १० तासांचे अवयवदान प्रबोधनाचे मोफत प्रशिक्षण देण्यासाठी कृपया खालील मुद्यांबाबतीत सूचना आपल्यामार्फत सर्व राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेकांना त्यांच्या व्हॉट्सअप ग्रुपवर देण्यात यावी. तसेच रासेयो स्वयंसेवकांनी १० तासांचे अवयवदान न्रबोधनाचे मोफत ऑनलाईन प्रशिक्षण दि. २५ फेब्रुवारी २०२५ पूर्वी पूर्ण करावे. 'ऑनलाईन अवयवदान प्रबोधन प्रशिक्षणाची सर्व माहिती आणि मोफत प्रशिक्षण सामुग्री मिळवण्यासाठी आणि प्रशिक्षणांत येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी रासेयो स्वयंसेवकांनी खालील लिंक वापरून टेलिग्राम ग्रुप जॉईन करावा. अधिक माहितीकरिता सोबतच्या पत्राचे अवलोकन करावे. कळावे, ही विनंती.

| | |
|---|---|
| 1 | Academic Year 2024-25 Free Study Material Online training in Organ Donation Awareness – https://t.me/+ucknS5R2KMlyMjl1 |
| 2 | FAQ 2024-25 Online Training – https://t.me/+fhjNBBSsrvY5Njl1 |

संचालक
राष्ट्रीय सेवा योजना

अधिक माहितीकरिता : मा. राज्य संपर्क अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, महाराष्ट्र शासन यांचे पत्र

मंत्रालयीन सेवा
जनहितार्थ सर्वदा

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,**

एलफिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर, ३, महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-४०० ००१.

ई-मेल- nssmantralaya@gmail.com दूरध्वनी क्र.०२२-२२६७९५६५

क्रमांक: रासेयो-२०२५/प्र.क्र.०८/ई-९३२२७४/रासेयो कक्ष, दिनांक: १८ फेब्रुवारी, २०२५.

**प्रति,**

**कार्यक्रम समन्वयक तथा संचालक,**
रासेयो संलग्नित सर्व विद्यापीठे व संचालनालये

**विषय : अवयवदान प्रबोधनाने दरवर्षी ४ लाख व्यक्तींना जीवनदान देण्याचे व १ लाख अंधांना दृष्टी देण्याचे मोफत ऑनलाईन प्रशिक्षण राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांना देणेबाबत....**

**संदर्भ** : श्री. श्रीकांत एम. आपटे, अध्यक्ष आणि प्रशिक्षण समन्वयक, V4 ऑर्गन फाऊंडेशन, मुंबई यांचे दिनांक ०१ जानेवारी, २०२५ रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयांकित संदर्भाधिन पत्राच्या अनुषंगाने आपणास असे कळविण्यात येते की, केंद्र शासनाच्या **"राज्य अवयव प्रत्यारोपण समितीच्या"** (ROTTO/SOTTO) तज्ञांचे मार्गदर्शन घेऊन V4ऑर्गन फाऊंडेशन, मुंबई यांनी अवयवदान प्रबोधन प्रशिक्षणाचे परिपूर्ण साहित्य तयार केले आहे. सदर कार्याचे महत्त्व जाणून इंडियन मेडिकल असोसिएशन, महाराष्ट्र राज्य, मुंबई ही संस्था V4ऑर्गन फाऊंडेशन, मुंबई यांच्या कार्यक्रमात सहभागी झालेली आहे. V4ऑर्गन फाऊंडेशन, मुंबई यांनी मागील ३ वर्षात १४ हजारहून जास्त महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना प्रशिक्षित केले असून, १० तासांत २ लाख विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करण्याची क्षमता त्यांच्याकडे आहे. त्यानुषंगाने टेलिग्रामव्दारे ऑनलाईन १० (दहा) तासांचे अवयवदान प्रबोधनाचे मोफत प्रशिक्षण देण्यासाठी कृपया खालील मुद्यांबाबतीत सूचना आपल्यामार्फत सर्व राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांना त्यांच्या व्हॉट्सअप ग्रुपवर देण्यात यावी.

"सर्व रासेयो स्वयंसेवकांनी १० (दहा) तासांचे अवयवदान प्रबोधनाचे मोफत ऑनलाईन प्रशिक्षण दिनांक २५ फेब्रुवारी, २०२५ पूर्वी पूर्ण करावे. प्रशिक्षण आठ भागात असून "ऑनलाइन अवयवदान प्रबोधन प्रशिक्षणाची सर्व माहिती आणि मोफत प्रशिक्षण सामुग्री मिळवण्यासाठी रासेयो स्वयंसेवकांनी खालील लिंक वापरून टेलिग्राम ग्रुप जॉईन करावा.

Academic Year 2024-25 Free Study Material online training in Organ donation awareness

https://t.me/+ucknS5R2KMIyMjI1

त्याचप्रमाणे प्रशिक्षणांत येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी खालील लिंक वरून दुसऱ्या टेलिग्राम ग्रुपमध्ये सामील व्हावे :

FAQ 2024-25 Online Training

https://t.me/+fhjNBBSsrvY5NjI1

तसेच सदरचे प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर सहभागी रासेयो स्वयंसेवकांना V4ऑर्गन फाऊंडेशन, मुंबई या संस्थेकडून ई-सर्टिफिकेट मिळेल. प्रशिक्षणासाठी लागणारा कालावधी रासेयो स्वयंसेवकांच्या नियमित उपक्रमासाठी लागू असलेला

कालावधीत धरण्यात येईल. याव्यतिरिक्त ज्या महाविद्यालयाच्या शंभरहून अधिक विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण पूर्ण केले आहे, त्या महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवकांच्या नेत्यांना १०० प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांमागे १ या प्रमाणात V4ऑर्गन फाऊंडेशन, मुंबई यांच्याकडून शिष्यवृत्ती देण्यात येईल. ती शिष्यवृत्ती महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या हस्ते स्वयंसेवकांना प्रदान करण्यात येईल. त्यामुळे स्वयंसेवकांना सन्मान झाल्याचे समाधान मिळेल.

त्यानुषंगाने आपल्या स्तरावरून आवश्यक त्या सूचना राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकाऱ्यांमार्फत सर्व राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांना देण्यात याव्यात.

आपला,

**(डॉ.निलेश मो. पाठक)**
राज्य संपर्क अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना,
महाराष्ट्र शासन